दिनांक : १२/०५/२०१६.

# प्रसिद्धी पत्रक

## महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (MAHATET) २०१५ पेपर I फेर परीक्षा दि.०७/०६/२०१६ रोजी आयोजित करण्यात येत असले बाबत.

महाराष्ट्र शासन मान्यतेने परिषदेच्या वतीने "महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (MAHATET) - २०१५" चे आयोजन दिनांक १६/०१/२०१६ रोजी करण्यात आले होते. सदर परीक्षेतील पेपरफुटीच्या पार्श्वभूमीवर या परीक्षेतील पेपर क्र. १ रद्द करण्यात आला होता. यापूर्वी घोषित केल्याप्रमाणे सदर परीक्षा दि.१८/०५/२०१६ रोजी स. १०.३० ते दु. १.०० वाजेपर्यंत आयोजित करण्यात येणार होती. तथापि दि.१८/०५/२०१६ रोजी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र विद्यापिठ, नाशिक यांच्या परीक्षा जाहीर झाल्या असल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये यासाठी सदर परीक्षा दिनांकात बदल करुन सदर परीक्षा दि.०७/०६/२०१६ रोजी सकाळी १०.३० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत आयोजित करण्यास शासनपत्र क्र. टिईटी-२०१६/(प्रक्र-२०)/टिएनटी-१, दि.११ मे २०१६ अन्वये शासन मान्यता प्राप्त झाली आहे.

त्यानुसार आता ही परीक्षा दि.०७/०६/२०१६ रोजी सकाळी १०.३० ते दुपारी १.०० वाजता आयोजित करण्यात येत आहे.

१. सदर दि. १६/०१/२०१६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा - २०१५ पेपर क्र. १ साठी ज्या परीक्षार्थीना Online प्रवेशपत्र (Hall Ticket) प्राप्त झाली होती. त्याच परीक्षार्थीना दि.०७/०६/२०१६ रोजीच्या महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा - २०१५ पेपर क्र. १ साठी परीक्षेस प्रविष्ठ होता येईल. फेर परीक्षेसाठी नव्याने अर्ज करु नये.

२. सदर फेर परीक्षेचे प्रवेशपत्र (Hall Ticket) परीक्षा केंद्र व इतर आवश्यकत्या माहितीसाठी परीक्षार्थीनी वेळोवेळी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या mahatet.in व mscepune.in या संकेतस्थळावर भेट द्यावी. (हेल्पलाईन नंबर - ९०७५०२४२१४/१६)

३. सदर परीक्षेसाठी आता नव्याने कोणाचेही आवेदनपत्र घेण्यात येणार नाही.

(बी. डी. फडतरे)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परीषद, पुणे.